(CNRMHSN110006142016)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.११९/२०१६

निशाणी ५० लगत

फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा जादा सरतपास वकील कु.पी.व्ही.काळेबाग यांचेमार्फत शपथेवर सुरु

१७. माझे नाव दिलीप महादेव बोराडे आहे. माझे वय ५९ वर्ष आहे. माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे.

१८. सदरची केस विजयसिंह केशव पाटील यांचेविरुध्द दाखल केलेली आहे. सदरकामी निशाणी ३/१ सोबत आयडीबीआय या बँकेच्या चेकची छायांकित प्रत हजर केलेली आहे. सदरचा चेक आरोपीने फिर्यादी कारखान्याच्या नावे दिलेला होता. सदर चेकवर आरोपीची सही आहे. सदरची सही मी ओळखतो. सदर चेकमधील मजकूर खरा व बरोबर आहे. कारखान्याचे रेकॉर्ड हालवताना सदर चेकची मूळ प्रत गहाळ झालेली आहे. त्याबाबत मी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. सदर तक्रार मी याकामी दाखल केलेली आहे. सदर तक्रार निशाणी ४९/१ येथे दाखल केली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर अदखपात्र तक्रारीस **निशाणी क्र.५१** देण्यात येते. (सदर कामी चेकची छायांकित प्रत असून आरोपीतर्फे विधिज्ञांनी अशी हरकत घेतली की, सदर छायांकित प्रत ही पडताळणी केलेली नाही. छायांकित प्रत दुय्यम पुरावा म्हणून वाचता येणार नाही. त्यामुळे, त्याला निशाणी देता येणार नाही. **आदेश** – सदरकामी मूळ चेकची प्रत गहाळ झाल्याचे फिर्यादीने सांगितलेले आहे. त्याबाबत पोलीस स्टेशनला दाखल केलेल्या तक्रारीची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. फिर्यादीने छायांकित प्रत दाखल करण्यास

पुरेसे कारण दिलेले आहे. त्यामुळे, सदर निशाणी ३/१ येथील चेकच्या छायांकित प्रतीस दुय्यम पुरावा म्हणून **निशाणी क्र.५२** देण्यात येते.)

१९. निशाणी ३/२ येथे सदर चेक अनादरीत झाल्याबाबतचे आयडीबीआय बँकेचा मेमो दाखल करण्यात आला आहे. त्यावर चेक नं.६८०२२ असा नमूद आहे. सदर चेक फंड्स इनसफिशियंट या कारणास्तव अनादरीत झाल्याचा शेरा त्यावर आहे. त्यावर बँकेचे मॅनेजर यांची सही व बँकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. मेमोस **निशाणी क्र.५३** देण्यात येते.

२०. निशाणी ३/३ येथे बाबासाहेब देशमुख सहकारी बँकेचे चेक अनादरीत झाल्याबाबतचे दिनांक २३/०७/२०१३ पत्र दाखल करण्यात आले आहे. त्यावर बँकेचे अधिकारी यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर पत्रास **निशाणी क्र.५४** देण्यात येते.

२१. निशाणी ३/४ येथे आरोपीस कारखान्याचे वकीलांमार्फत दिलेल्या नोटीशीची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर तत्कालीन वकील व माहितीगार इसम यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (आरोपीच्या वकीलांनी अशी हरकत नोंदवली की, सदर साक्षीदाराची सदर नोटीसवर सही नाही. त्यामुळे सदर नोटीशीतील मजकूर सिध्द होत नाही. त्यामुळे सदर नोटीसला निशाणी देता येणार नाही. **आदेश** – सदर साक्षीदार हे फिर्यादी कारखान्याच्या वतीने माहितीगार इसम म्हणून साक्ष देण्यासाठी हजर आहेत. त्यांनी तत्कालीन माहितीगार इसमाची सही ओळखत असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे, सदर हरकत अंतिम युक्तीवादाच्यावेळी विचारात घेण्यात येईल.) सबब, सदर नोटीशीस **निशाणी क्र.५५** देण्यात येते.

२२. निशाणी ३/५ येथे सदर नोटीस आरोपीने घेण्यास नकार दिल्यामुळे परत आलेला लखोटा दाखल करण्यात आला आहे. त्यावर पोस्टाचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर परत आलेल्या लखोट्यास **निशाणी क्र.५६** देण्यात येते.

२३. निशाणी ३/६ येथे केस चालविण्याबाबतचा संचालक मंडळाचा ठराव क्र.६(२६) दाखल करण्यात आलेला आहे. त्यावर कारखान्याचे अधिकारी यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर ठरावास **निशाणी क्र.५७** देण्यात येते.

२४. दिनांक ०७/०८/२०२३ रोजी संचालक मंडळाचा ठराव क्र.४(४) दाखल करण्यात आलेला आहे. त्यावर कारखान्याचे अधिकारी यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर ठरावास **निशाणी क्र.५८** देण्यात येते.

२५. निशाणी ४५/१ येथे आरोपीने कारखान्यासोबत केलेला ऊस तोडणी वाहतूक हंगाम २०१२–१३ चा करार दाखल केलेला आहे. त्यावर आरोपी, जामीनदार व मुख्य शेती अधिकारी यांची सही आहे. सदर सह्या मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (आरोपीच्या वकीलांनी अशी हरकत घेतली की, सदर करारावर साक्षीदाराची सही नसल्यामुळे करारास निशाणी देता येणार नाही. **आदेश** – सदर केसमधील साक्षीदार यांना सदरचे केस चालविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यांनी मुख्य शेती अधिकारी व कार्यकारी संचालक यांची सही ओळखत असल्याचे कथन केले आहे.) सबब, सदर करारास **निशाणी क्र.५९** देण्यात येते.

२६. निशाणी ४५/२ येथे मी आरोपीचा सन २०१२–१३ चा खातेउतारा दाखल केलेला आहे. त्यावर माझी व कार्यकारी संचालक यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर खातेउता–यास **निशाणी क्र.६०** देण्यात येते.

सरतपास पूर्ण.

उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.पी.जी.शिंदे यांचेमार्फत सुरु

२७. माझे एफ.वाय.बी.कॉम पर्यंत शिक्षण झाले आहे. मी १९८६ सालापासून अकांऊंट विभागात कार्यरत आहे.

वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकूब

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.01.13 17:58:12 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १३/०१/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****